लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

Advertorial

# अश्रूंना वाट मोकळी करून देणारे ऑपरेशन

**Dacryocystorhinostomy** (DCR) ज्याला मराठीत नासूर म्हणतात हा डोळ्यांचा आजार आहे. हा जर डोळे आणि नाक याच्याशी संबंधित आहे. अश्रूंना वाट मोकळी करून देण्यासाठी कराव्या लागणाऱ्या शस्त्रक्रियेशी संबंधित विकार आहे. यावर डॉ. गाडगीळ आय हॉस्पिटल मध्ये प्रभावी उपचार होतात. डॉ. गाडगीळ आय हॉस्पिटलचे असोसिएट ऑपथोमॉलॉजिस्ट डॉ. नितीन पवार यांनी (DCR) नासूर आजार आणि उपचार याविषयी दिलेली माहिती :-

**प्र. : DCR हे एक प्रकारचे ऑपेरेशन आहे त्याचा Full Form काय? याला मराठीत नासूर असेही म्हणतात. याची लक्षणे काय असतात? कोणाला त्याची गरज असते? आणि काय केले जाते?**

उ. : DCR चा Full Form म्हणजे Dacryocystorhinostomy यामध्ये आपल्या डोळ्यांमध्ये अश्रूची एक नळी असते जी नाकाद्वारे तेथे उतरते. जे अश्रू आपल्या डोळ्यांमध्ये तयार होतात ते या नळीद्वारे नाकामध्ये उतरतात. काही रुग्णांमध्ये ही नळी ब्लॉक होऊन अश्रू जाण्याचा मार्ग बंद होतो. तयार होणारे अश्रू या मार्गाद्वारे बाहेर जाऊ शकत नाहीत. त्यामुळे अश्रूंच्या पिशवीला सारखा संसर्ग होत राहतो. यामुळे रुग्णामध्ये डोळा लाल होणे, डोळ्यातून सतत पाणी येणे, डोळा चिकटणे, अशी लक्षणे दिसून येतात. जेव्हा हे इन्फेक्शन खूप प्रमाणात वाढते त्यावर रुग्णाने वेळीच व्यवस्थित उपचार नाही घेतले तर त्या जागी पू तयार होऊन सूज आल्यासारखे दिसते. अशा केसमध्ये अश्रूंची पिशवी त्या संसर्गामुळे फाटण्याची भीती असते. डोळ्यांमध्ये पिशवीची जिथे जागा असते तिथे एक प्रकारचे ओपनिंग तयार होते. त्याला आपण फ़िस्चूला असं म्हणतो.



**डॉ. नितीन पवार**
**सहाय्यक नेत्र शल्य चिकित्सक**
**डॉ. गाडगीळ आय हॉस्पिटल**
**आणि लेसिक लेझर सेंटर**

**प्र. : यावर औषध उपचार Medical Treatment आहे का? की शस्त्रक्रिया Surgical Treatment करावी लागते?**

उ. : अशा प्रकारचा रुग्ण जेव्हा तपासणी साठी येतो तेव्हा आम्ही त्याची प्राथमिक चाचणी करतो. आपण रुग्णाची सैक सीरिंजिंग नावाची टेस्ट करतो. याद्वारे आपण अश्रूंचा मार्ग किती कार्यरत आहे हे चेक करतो. या पेटन्सी टेस्टमध्ये जर अश्रूंचा मार्ग जर तो बंद झाला आहे, तर ऑपरेशन द्वारे हा मार्ग दुरुस्त करता येतो. औषधे किंवा गोळ्यांनी प्राथमिक स्टेजला इन्फेकशन नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करतो. तरीपण तो अश्रूंचा मार्ग बंद झाला आहे असेल तर याला सर्जरी हा एकमेव पर्याय आहे.

**प्र. : यात सर्जरीचे दोन प्रकार असतात एक म्हणजे External DCR (बाह्य नासूरची शस्त्रक्रिया) आणि दुसरी म्हणजे Endoscopic DCR या बद्दल अधिक माहिती काय सांगाल?**

उ. : External DCR (बाह्य नासूरची शस्त्रक्रिया) आणि Endoscopic DCR या दोन प्रकारच्या शस्त्रक्रिया यासाठी वापरल्या जातात. Endoscopic DCR मध्ये नाकाद्वारे दुर्बिणीने ही शस्त्रक्रिया केली जाते. Endoscopic DCR ह्या शस्त्रक्रियेमध्ये तुमच्या त्वचेवर व्रण दिसत नाही. आतमध्ये आपण जो अश्रूंच्या नळीचा मार्ग उघडा करतो त्यामध्ये जी अश्रूंची पिशवी असते त्याचे function कायम ठेवले जाते आणि बाहेर काही दिसत नसल्यामुळे त्याचे रिझल्टही चांगले असतात. या सर्जरीमध्ये रक्तस्रावाचे प्रमाण खूपच कमी असते. रुग्ण लवकर बरा होतो. Endoscopic DCR चे हे फायदे आहेत. काहीवेळेस जर रुग्णाला दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करूनही परत संसर्ग होत असेल तर किंवा परत एकदा सर्जरी करायची असेल तर तेव्हा External DCR (बाह्य नासूरची शस्त्रक्रिया) करावी लागते. या मध्ये अश्रूंच्या पिशवीची जागा असते तिथे सर्जिकली कट देऊन ती जागा खुली करण्यात येते. आणि नाकाच्या आतमध्ये व अश्रूंच्या नळीचा एक बायपास मार्ग बनवतो. या शस्त्रक्रियेत रक्तस्राव होण्याचे प्रमाण जास्त असते.

**प्र. : या शस्त्रक्रिया डॉ. गाडगीळ आय हॉस्पिटल आणि लेसिक लेझर सेंटरमध्ये होतात का ? कॅशलेस सुविधा उपलब्ध आहे का ?**

उ. : डॉ. गाडगीळ आय हॉस्पिटल आणि लेसिक लेझर सेंटरमध्ये या दोन्ही प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. त्यासाठी रुग्णांना कॅशलेस सुविधा देखील उपलब्ध आहे.

**प्र. : एकदा ऑपरेशन झाल्यावर हा त्रास परत उदभवण्याचा संभव असतो का?**

उ. : ज्या रुग्णांचे वय पन्नासपेक्षा अधिक आहे त्यांच्यामध्ये हा त्रास परत उदभवण्याचा संभव असतो. काही लोकांना नाकाचे आजार असतात. नाकाचे हाड थोडे वाढले तर अश्रूंचा मार्ग बंद होतो. काहींना वारंवार सर्दीचा त्रास असतो किंवा वारंवार येणाऱ्या शिंकेमुळे मार्ग बंद झाला तर असेल परत शस्त्रकिया करावी लागते.

**डॉ. गाडगीळ डोळ्यांचे हॉस्पिटल आणि लेसिक लेझर सेंटर : १ ला मजला, पॅरडाईज टॉवर, मॅकडोनाल्डच्या बाजूला, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.)**

**डॉ. गाडगीळ डोळ्यांचे हॉस्पिटल : श्रेयस अपार्टमेंट, हनुमान डेअरीजवळ, रामचंद्रनगर, ठाणे (प.)**

**अपॉइंटमेंटसाठी संपर्क : 9820003756 / 9820004756 / 9820017487**

**Cashless Facility Available**